महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 3८ /२०२४ — दि. ०७/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA अंतर्गत तत्वज्ञान ते कासारवडवली दरम्यान मे. मिलन इन्फ्रा. कंपनीकडून पातलीपाडा व वाघबीळ ब्रिजजवळ **यू व आय गर्डर टाकण्याचे काम** करण्यात येणार असल्याने त्यावेळी पातलीपाडा व वाघबीळ ब्रिजवर ठाणे घोडबंदर वाहिनी वाहतूकीसाठी बंद करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) ठाणे घोडबंदर वाहिनीवर पातलीपाडा ब्रिजजवळ यु व आय गर्डरचे काम करताना घोडबंदरच्या दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **पातलीपाडा ब्रिज चढणीजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) ब्रम्हांड सिग्नल जवळून विरूध्द दिशेने पातलीपाडा ब्रिज वरून ब्रिज उतरणीपुढे ओपन केलेल्या कट मधून डावे वळण घेवून पातलीपाडा ब्रम्हांड कडे जाणारी वाहने वाघबीळ ब्रिज खालून व घोडबंदर कडे जाणारी वाहने वाघबीळ ब्रिजवरून इच्छित स्थळी जातील.

ब) घोडबंदर कडून ठाणे कडे येणारी सर्व वाहने पातलीपाडा ब्रिजवर न चढता स्लीप रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) ठाणे घोडबंदर वाहिनीवर वाघबीळ ब्रिजजवळ यू व आय गर्डरचे काम करताना घोडबंदरच्या दिशेने जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **वाघबीळ ब्रिज चढणीजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) वाघबीळ ब्रिजचे सुरूवातीस ओपन केलेल्या कट मधून विरूध्द दिशेने वाघबीळ ब्रिजवरून ब्रिज उतरणी पुढे ओपन केलेल्या कट मधून डावे वळण घेवून आनंदनगर सिग्नल मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) घोडबंदर कडून ठाणे कडे येणारी सर्व वाहने वाघबीळ ब्रिजवर न चढता स्लीप रोडने इच्छित स्थळी जातील.

१) दि. ०७/०३/२०२४ ते दि. १३/०३/२०२४ रोजीपोवतो पातलीपाडा ब्रिजजवळ पिलर नं. ११० ते १११, ११३ ते ११६,
२) दि. १४/०३/२०२४ ते दि. १८/०३/२०२४ रोजीपावेतो वाघबीळ ब्रिजजवळ पिलर नं. १३४ ते १३७
वर यु व आय गर्डर टाकण्याचे काम रात्रौ २३:५५ ते सकाळी ०५.०० वाजेपावेतो करण्यात येणार आहे.

सदर वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान यु व आय गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

CamScanner

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—
पोलीस उप आयुक्त, मिरा भाईंदर आयुक्तालय वाहतूक विभाग.
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

<u>प्रत</u> :— <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>
२/— सदरची अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :— <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :— <u>संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.</u>
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner